**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०८/०९/२०२६

*प्लास्टर ऑफ पॅरीसच्या (POP) मूर्तींना विशेष चिन्ह करण्याबाबतच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे सर्व मूर्तीकारांना आवाहन*

महाराष्ट्र शासन पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग मंत्रालय यांच्या शासन निर्णय क्रमांक : याचिका-२०२४/प्र.क्र.३४/तां.क.३, दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ तसेच दि.०१ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) मूर्तीचे उत्पादक व विक्रेते यांनी प्लास्टर ऑफ पॅरीसची (POP) मूर्ती विक्री करताना मूर्तीच्या मागील बाजूस, स्पष्टपणे दिसेल अशा स्वरूपाचे ऑईल पेंटने लाल रंगाने गोल आकाराचे चिन्ह करावे, तसेच मूर्ती विक्री करताना याबाबत नोंदवही ठेवण्याच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.
सदरील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणेबाबत वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या बैठकीत सर्व मूर्ती उत्पादक व विक्रेते यांना यापूर्वीच प्रशासनामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.

तरी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत सर्व मूर्तीकारांना व मूर्ती विक्रेत्यांना आवाहन करण्यात येत आहे कि, त्यांनी प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) पासून बनविलेल्या मूर्त्यांच्या संदर्भात शासन निर्णयानुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) च्या मूर्ती विक्री करताना मूर्तीच्या मागील बाजूस, स्पष्टपणे दिसेल अशा स्वरूपाचे ऑईल पेंटने लाल रंगाने गोल आकाराचे चिन्ह करावे, तसेच त्याबाबत नोंदवही ठेवावी व महानगरपालिकेस सहकार्य करावे.